राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTCA),
नवी दिल्ली यांच्या

# व्याघ्र प्रकल्पासाठी प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धती / मार्गदर्शक सुचना




संकलन

**श्री. सचिन शिंदे**

विभागीय वन अधिकारी,
ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर

# प्रस्तावना



ही पुस्तिका वाघ अभयारण्यात कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी उपयुक्त अशा मानक कार्यपद्धती (SOPs) व मार्गदर्शक तत्वांचे सविस्तर संकलन आहे. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTCA) यांनी SOPs चे मूळ स्वरूप इंग्रजी भाषेत उपलब्ध करून दिले आहे. क्षेत्रीय कर्मचाऱ्यांसाठी ही मराठी भाषांतरित पुस्तिका तयार करण्यात आली आहे, जी त्यांना कामाच्या अनुषंगाने तसेच उद्‌भवणाऱ्या आपातकालीन परिस्थितीमध्ये मदत करेल.

ही पुस्तिका सुस्पष्टता व सोपी समज निर्माण करण्यासाठी तयार करण्यात आली असली तरी SOPs चा सखोल आणि संपूर्ण अभ्यास करण्यासाठी NTCA च्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या मूळ इंग्रजी SOPs चा संदर्भ घेणे आवश्यक आहे. यामुळे प्रक्रियांची अचूक समज व योग्य कार्यवाही सुनिश्चित होईल.

ही पुस्तिका तयार करण्यामागील प्रयत्न वाघ आणि इतर वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धन अधिक प्रभावीपणे सशक्त करण्यासाठीची कटिबद्धता दर्शवितो. ही पुस्तिका क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्यांचे पालन करण्यासाठी उपयुक्त ठरेल आणि त्यांच्या नैसर्गिक वारशाच्या संरक्षणासाठीच्या प्रयत्नांना बळकट करेल. सर्व क्षेत्रीय कर्मचा-यांना त्यांच्या समर्पित कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा!

**डॉ. प्रभु नाथ शुक्ल (IFS)**
वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक
ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर

# अनुक्रमणिका


| | | पान क्र. |
|---|---|---|
| १. | वाघाचा मृत्यु झाल्यास वापरावयाची प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती. जानेवारी, २०१३ | १-१२ |
| २. | वाघ, बिबट यांचे मृत शरीर / अवयव नष्ट करावयाची प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती. मार्च, २०१३ | १३-१५ |
| ३. | मानवी वास्तव्य असणाऱ्या भागात वाघाच्या भरकटण्यामुळे उद्भवलेली आणीबाणीची परिस्थिती हाताळणेबाबतची प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती. जानेवारी, २०१३ | १६-२४ |
| ४. | जंगलातील वाघांच्या सोडून दिलेल्या / अनाथ बछड्यांसाठी आणि वयस्कर किंवा जखमी वाघांसाठी वापरावयाची प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती. जुलै, २०१४ | २५-२९ |
| ५. | व्याघ्र प्रकल्पांमध्ये भटक्या आणि मोकाट कुत्र्यांबाबत करावयाचे कार्यवाहीबाबत प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धती. | ३०-३३ |
| ६. | सक्रिय व्यवस्थापनासाठी स्त्रोत क्षेत्रांमधून वाघांच्या पूनर्वसनसाठी प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धती. | ३४-३५ |
| ७. | वाघामुळे पशुधन - हानीस सामोरे जाण्यासाठी प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धती. | ३६-४१ |
| ८. | व्याघ्र संवर्धन मजबूत करण्यासाठी आंतरराज्यीय समन्वयासाठी प्रमाणभुत प्रचलित कार्यपद्धती. | ४२-४३ |
| ९. | टायगर सफारीची स्थापना करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे | ४४-४४ |
| १०. | मांजर कुळातील मोठ्या प्राण्यांना मनुष्य भक्षक म्हणून घोषित करणे बाबत मार्गदर्शक सूचना, २००७ | ४५-४७ |
| ११ | विद्युत करंटमुळे वाघ आणि इतर वन्यजीवांचा मृत्यू रोखण्यासाठी उपाययोजना. | ४८-५० |
| १२. | ॲव्हियन इन्फ्लूएंझा प्रतिबंध, नियंत्रण कृती योजना | ५१-५३ |

# १ वाघाचा मृत्यु झाल्यास वापरावयाची प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती. जानेवारी, २०१३

फक्त व्याघ्र प्रकल्प नव्हे तर संपूर्ण क्षेत्रासाठी लागू

**जबाबदारी :**

| | |
|---|---|
| राज्य स्तरावर | (CWLW) राज्य मुख्य वन्यजीव रक्षक |
| व्याघ्र प्रकल्प | (F.D.) क्षेत्र संचालक |
| राष्ट्रीय उदयान / वन्यजिव अभयारण्य संवर्धन राखिव क्षेत्र | क्षेत्र व्यवस्थापक |
| प्रादेशिक-क्षेत्रसाठी इ. साठी ज्यांच्या कार्यक्षेत्रात नमूद क्षेत्र येते | संबंधीत उपवनसंरक्षक/ विभागीय वन अधिकारी व संबंधित क्षेत्रासाठीचे 'वन्यजीव रक्षक' |

**'वन्यजीव रक्षक' म्हणून वनरक्षक, वनपाल, वनक्षेत्रपाल व सर्व वरिष्ठ अधिकारी प्रत्येक वनरक्षक, वनपाल व वनपरिक्षेत्र अधिकारी हे अधिनस्थ क्षेत्रसाठी 'वन्यजीव रक्षक' म्हणून घोषीत करण्यात आलेले आहेत.**



## कुठे वापर करावा :

**वाघाचा मृत्यु / वाघाच्या अवयवांची जप्ती/ किंवा जेथे घटनेची नोंद झाली आहे परंतु वाघाचे अवयव मिळाले नाही/शव मिळाले पण तेथे इतर संबंधित क्षेत्रीय पुरावा मिळवण्यासाठी जी कार्यपद्धती वापरायची आहे, त्याबाबतच्या सूचना.**

(i) **अ ) अपराधाच्या जागेवर/घटना स्थळी** (जबाबदारी : वनपरिक्षेत्र अधिकारी, सहायक वन संरक्षक/ विभागीय वन अधिकारी)

- तात्काळ घटना स्थळी पोहचावे. त्याचवेळी कार्यक्षेत्राचे क्षेत्रसंचालक / वनसंरक्षक / मुख्य वन संरक्षक यांना तसे कळवावे.
- विभाग स्तरावर विशेष तपास पथक (Special Investigation Team) असल्यास घटनास्थळी तात्काळ बोलवावे. त्यांनी तपास साहित्य (Kit) आणावी.
- तपास पथक (Investigation Team) घटनास्थळी ताबडतोब बोलवावे. तपासणी चमूला सोबत तपासणी साहित्य (कीट) आणणे बंधनकारक आहे.
- दोरीने घटना स्थळाभोवती कडे करावे. जेणेकरुन पुराव्यात छेडछाड होणार नाही.
- घटनास्थळाचे वेगवेगळा कोनातून फोटो घ्यावे/चित्रीकरण करावे म्हणजे मृत प्राण्याची तुलना कॅमेरा ट्रॅप छायाचित्रसोबत (आधी केले असल्यास) करता येईल. फोटो किंवा व्हिडिओ चित्रीकरण जवळून व दुरुन अशा दोन्ही पद्धतीने



करावे. घटनास्थळी सापडलेल्या विविध वस्तूचे अंतर दाखविण्यासाठी टेप वापरावी. घटनास्थळाचे परिस्थितीजन्य निरिक्षण करुन ते तपशीलवार नोंदवावे.

- पुराव्यात लबाडीने बदल करु नये.
- संपूर्ण क्षेत्र तपासाकरिता आणि पुरावा गोळा करण्यासाठी चौरस चौकटीत (Grids) किंवा वर्तुळामध्ये (Circles) विभागावे.
- बारीकसारीक तपशीलाची नोंद करावी, जसे दिनांक, वेळ, जीपीएस स्थळ, हवामान, इ. तपासकार्यात घेतलेल्या प्रत्येक टप्प्याची आणि कार्यवाहीची व्यवस्थित नोंद करावी. तपास अधिकाऱ्याने फौजदारी प्रक्रियासंहितेच्या कलम 172 (CrPC Sec. 172) प्रमाणे प्रकरण रोजनिशी लिहीणे सुरु करावे अशी शिफारस आहे;
- जप्तीनामा/अटक पंचनामा इ. दस्ताऐवज घटनास्थळी पंचासमक्षपत्र तयार करावेत.
- शोध, जप्ती आणि अटकेच्या वेळी २ स्वतंत्र साक्षीदार, जेथे शक्य असेल, त्या ठिकाणी सोबत असावेत. शक्य नसल्यास त्याबाबत नोंद करावी.
- संपूर्ण क्षेत्राचे सर्वेक्षण करावे. जर प्राण्यांची आपापसात लढाई झाली असेल अशा ठिकाणी, दुसऱ्या जखमी प्राण्याचा मागोवा (Trail) घ्यावा.
- घटनास्थळापासून सर्वबाजूने किमान ५०० मी. अंतरापर्यंत पुरावा मिळण्यासाठी व्यवस्थित शोध घ्यावा. बरेचदा असे आढळून आले आहे कि, वन्यप्राण्याला गोळी लागल्यानंतर किंवा विषबाधा झाल्यावर तो प्राणी घटनास्थळापासून काहीसा दूर



जातो. अवैध शिकारी सुद्धा प्राण्याच्या शरीराला काही अंतरावर सोईच्या ठिकाणी घेवून जातात, आणि तेथे त्याचे कातडे वेगळे करतात.

- घटनास्थळाजवळ असलेले नदी, तलाव किंवा इतर पाण्याचे साठे इ.चा पुरावा मिळविण्यासाठी शोध घ्यावा, कारण शिकारी कातडी काढण्याकरिता, शस्त्रे साफ करण्यासाठी पाण्याचा वापर करतात. काही वेळा असे निदर्शनास आले आहे कि शिकारी नदी, नाल्याच्या काठाने चालत जावून वाघाच्या संरक्षित क्षेत्रात प्रवेश करतात.
- शक्य असल्यास प्राण्याच्या पावलांचे ठसे / माणसाचे (पाऊल, चप्पल, जोडा इ.) ठसे / वाहनाच्या चाकाच्या खुणांचे प्लॅस्टर ऑफ पॅरिस वापरुन ठसे (कास्ट) घ्यावेत.
- बाहेर निघायचे सर्व मार्ग, रस्ते, वाटा इ.चा शोध घ्यावा. त्यासाठी, उपलब्ध असल्यास, प्रशिक्षित कुत्र्यांचा वापर करावा.
- प्राण्याचे मृत शरीर त्याला झालेल्या जखमा, गोळांचे निशाण, गोळीने झालेली जखम, विषबाधेची लक्षणे इत्यादी बाह्य पुराव्यांची काळजीपूर्वक नोंद करावी. शिवाय प्राण्याच्या मृत शरीराचे मोजमाप घ्यावे. शरीरावर दिसलेल्या जखमांचे व्यवस्थित मोजमाप घ्यावे; त्यांचे वर्णन करावे, त्याबाबत खुलासा नोंदवावा.

- सर्व संभावित पुराव्यांचा त्यांच्या मुळस्थितीत काळजीपूर्वक शोध घेवून ते गोळा करावेत. पुरावा म्हणून त्यांची गरज असल्यास ते जतन करावेत.
- जमीनीवर, डोळयाच्या उंचीवर तसेच त्यापेक्षा जास्त उंचीवर असलेल्या भागांचा पुराव्यासाठी शोध घ्यावा. (उदा. छुप्या जागा / मचान / झाडावरील गोळयांचे निशान / ताज्या तुटलेल्या फांद्या / जमिनीवर कोठे आग पेटवली असल्यास, जळलेल्या आगकाड्या वगैरे). ज्या ठिकाणाहुन नमुने एकत्रित करावयाचे त्या जागा; उदा. त्या ठिकाणाहुन रक्त / पेशी (उती) / केस / केसाळ कातडी / दात / हाडाचे तुकडे इ. तसेच गन पावडर, कापडाचे तुकडे, धागे, तंतू / रंगाचे टवके अथवा पोपडे / माती / गोळीचे काडतुसाचे आवरण / गोळा / पायांचे ठसे / चाकाच्या खुणा / गुटखा / खर्रा पाकिट / आगकाड्या / अन्न वस्तु / जलसाठ्याचे पाणी इ. वस्तुंचे नमुने गोळा करावेत.
- घटनास्थळी सापडलेली हत्यारे, साहित्य सुरक्षितपणे ठेवावी. जेणेकरुन त्यावरील बोटांचेठसे किंवा डाग वगैरे चांगल्या स्थितित राहतील.
- एखादेवेळी आरोपीने अंगात घातलेले कपडे रक्ताच्या किंवा इतर द्रावाच्या डागाकरिता वगैरे जप्त करावे लागतात. जर कातडी काढली असल्याचा संशय असल्यास, आरोपीच्या नखांचे नमूने घ्यावेत.
- नमुने गोळा करण्याकरिता पारदर्शक पॉलिथीन पिशव्या / डब्या वापराव्यात.
- प्रत्येक नमुना किंवा वस्तु स्वतंत्र पॉलिथीन पिशवीत गोळा करावी. सर्व वस्तु एकाच पिशवित संग्रहित करु नये.
- गोळा केलेले नमूने: तज्ञांकडे/कोर्टात पाठवायचे असतात. नमुने पाठविलेल्या पत्रांची प्रत कार्यालयातील सरकारी फाईलमध्ये ठेवावी.
- गोळा केलेल्या नमुन्याकरिता व्यवस्थित (लेबल) तयार करा आणि चिपकवा आणि शिक्का लावा. प्रत्येक नमुन्याला वेगळा क्रमांक देवून त्याचे थोडक्यात वर्णन जोडावे.
- शवविच्छेदन पथक उपलब्ध असल्यास, शवाची मरणोत्तर तपासणी करुन घ्यावी, अन्यथा शव अतिशीत पेटीत ठेवावे. मरणोत्तर तपासणी केवळ दिवसा उजेडी करावी.

- शवविच्छेदन (Post Mortem) करतांना व्हिसेरा व टिशूजचे नमुने गोळा करावेत. व्हिसेराचे नमुने नामवंत न्याय सहायक प्रयोगशाळेला पाठवावेत. टिशूजचे नमूने भारतीय वन्यजीव संस्था, देहरादून, भारत सरकार (W.I.I.) कडे किंवा देशातील इतर मान्यताप्राप्त संस्थेकडे जेथे D.N.A. प्रोफाईलिंग आणि हिस्टोपॅथॉलाजीची सोय आहे अशा ठिकाणी पाठवावे.
- शवविच्छेदन (Post Mortem) अहवाल पूर्ण करुन तो मुख्य वन्यजीव रक्षक (Chief Wildlife Warden) यांचेकडे पाठवावा. त्याची प्रत राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाकडे पाठवावी.
- कायद्यातील तरतुदीप्रमाणे आणि सक्षम अधिकाऱ्याच्या उपस्थितीत (कमीतकमी उपवनसंरक्षक दर्जाचा अधिकारी) मृत प्राण्यावर अत्यंसंस्कार करावे.
- सामाजिक संस्था मधील प्रतिनिधीत्व असलेल्या स्वतंत्र शवविच्छेद चमु बरोबर क्षेत्रसंचालक किंवा उपवनसंरक्षक दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्या समोरच मृत शरीराचे दहन करुन ते नष्ट करावे.
- मृत शरीर दहन करुन नष्ट करतानाच्या पूर्ण प्रक्रियेचे संगतवार छायाचित्रण व व्हीडीओ चित्रीकरण करावे.
- दहन स्थळ सोडण्यापुर्वी मृत शरीर त्याच्या हाडांसहीत पुर्णपणे जळाल्याची खात्री करावी.



- मृत शरीर संपुर्ण जळाल्याची खात्री केल्यानंतर शवविच्छेदन चमु व संबंधीत नियंत्रण अधिकारी यांची स्वाक्षरी असलेला, मृत शरीरदहन केल्याबाबतचा पंचनामा तयार करुन अंतिम अहवाल (जोडपत्र - १ प्रमाणे) मुख्य वन्यजीव रक्षक यांना सादर करावा, त्याची प्रत संबंधीत छायाचित्रे व दस्ताऐवजासह राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांना पाठवावी.
- प्राण्याच्या अवयवांची जप्ती केली असल्यास, ते जर कोर्टात खटला चालविण्यासाठी पुरावा म्हणून हजर करायचे असतील तर त्यांची विल्हेवाट न लावता, संबंधित न्यायालयाचा परवानगी / आदेश प्राप्त झाल्यावरच त्यांची विल्हेवाट लावावी.
- विभागाचा प्रारंभिक गुन्हा अहवाल (POR) /अथवा एफ.आय.आर. (FIR) जारी करावा.
- जप्तीनामा आणि अटकेचा मेमो आरोपीच्या सहीसहित तयार करावेत. त्यात साक्षीदारांच्या सह्या, घटनास्थळाचा नकाशा आणि वनअधिकाऱ्याचे प्राण्याच्या जातीची ओळख पटवल्याचे प्रमाणपत्र असले पाहिजे. या वनअधिकाऱ्याचे पद सहायक वन संरक्षकाचे खालचे नसावे आणि त्याने प्राण्याची प्रजाती आपल्या या क्षेत्रातील प्रशिक्षणाच्या आणि अनुभवाच्या आधारावर ओळखल्याचे प्रमाणित केले पाहिजे..

**( ii )  जर संशयितांना अटक झाली असेल तर:**

- संशयिताची पुढील माहिती, जसे नाव पत्ता, शरिराचा तपशील, फोटो, उंची, वजन वगैरे एकत्रित करावी. त्याची झडती घेतांना / अटक करतांना/विचारपूस करतांना, टेलिफोन नंबर, मोबाईलनंबर, रोजनिशी, त्यात कागदावर केलेली आकडेमोड इ. जप्त करण्यासाठी विशेष काळजी घ्यावी. त्याचे लागेबांधे ठावठिकाणा शोधण्यासाठी ही माहिती निर्णायक असु शकते.
- अटक केलेल्या व्यक्तिला त्याने केलेल्या गुन्ह्याचा तपशील आणि अटक करण्याचे कारण देणे आवश्यक आहे. (फौजदारी व्यवहार संहितेच्या कलम ५० प्रमाणे तसेच भारतीय संविधानाचे २२ कलमाप्रमाणे).

- ज्यात अटकेचे कारण आणि आधार दिले आहेत असा अटक पंचनामा तयार करावा आणि त्यात कारणे व आधार यांचा उल्लेख करावा.
- वन्यजीव (संरक्षण) अधिनियमाच्या कलम 50(8) (WLPA) नुसार संशयितांचे आणि/ किंवा साक्षीदारांचे त्यांच्या सहीसहित जबाबांची नोंद करावी. हे जबाब सहायक वनसंरक्षक किंवा त्यावरील अधिकाऱ्याने, ज्यांना या संबंधात राज्यशासनाने प्राधिकृत केले आहे आणि जे वन्यजीव (संरक्षण) अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे आवश्यक आहे, नोंदवावे.
- फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ५० प्रमाणे आणि जोगिंदरसिंग प्रकरणातील सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार, आरोपीने नामित केलेल्या व्यक्तिला आरोपीच्या अटकेची  तसेच त्याला कोठे ठेवले आहे याची माहिती द्यावी.
- अटक केलेल्या संशयित आरोपीची माहितीः आरोपीची वैद्यकिय तपासणी करण्याची व्यवस्था करावी, आणि त्याला २४ तासाच्या आत संबंधित मॅजिस्ट्रेट समोर हजर करावे. जर आरोपीचे मागचे पुढचे संबंध, धागेदोरे शोधणे गरजेचे वाटत असले तर त्याच्या रिमांडसाठी तसा अर्ज द्यावा. ह्यासाठी तुमच्या स्थानिक न्यायालयातील सरकारी वकील संपर्क साधावा जेणेकरुन आरोपीचा रिमांड मिळवता येईल.
- जर आरोपी महिला असेल; तर तिची वैद्यकिय तपासणी केवळ अधिकृत नोंदणी असलेल्या महिला वैद्यकिय व्यवसायिकाकडून करणे आवश्यक आह
- जोपर्यंत आरोपी तुमच्या ताब्यात आहे, तोपर्यंत त्याच्या आरोग्याची आणि सुरक्षिततेची व्यवस्थित काळजी घेणे बंधनकारक आहे. जर आरोपी विभागाच्या कोठडीत असतांना आजारी पडला तर त्याला वैद्यकिय मदत पुरवावी किंवा त्याला उपचारासाठी दवाखान्यात भरती करणे आवश्यक आहे.
- प्रश्नोत्तराद्वारे आणि त्यातून मिळणारे इतर धागे-दोरे तपासत प्रकरणाची कसून चौकशी करावी; यांत Link प्रस्थापित करुन आरोपीने दिलेल्या कबुलीजबाबानुसार आणि माहितीनुसार इतर लोकांना अटक करावी.
- अटक केलेल्या व्यक्तीस स्वतःचे रक्षण करण्यासाठी त्याने निवडलेल्या कायदेशीर सल्लागाराचा सल्ला घेण्याचा अधिकार आहे. (भारतीय संविधान २२ (१) प्रमाणे).

- जर अटक केलेला आरोपी गरीब असेल तर त्याला कायदेशीर सेवा संस्थेकडून मोफत कायदेशीर सल्ला मिळण्याची तरतूद आहे. (भारतीय संविधान ३९ (अ) प्रमाणे
- केवळ संशयाच्या आधारावर अटक करु नये. (फौजदारी प्रक्रियासंहिता, कलम १४५ प्रमाणे)
- जर कारणाशिवाय अटक झाली असेल किंवा बेकायदेशीररित्या अडकवले असेल तर अशा व्यक्तीस भरपाई मिळण्याची तरतूद आहे.
- मनोविश्लेषण तपासणी अंतर्गत आरोपीने दिलेल्या निवेदनाला तसा पुरावा म्हणुन गौण महत्त्व असले तरी अट्टल गुन्हेगारांच्या बाबतीत जे तपासात सहयोग देत नाही, अशा तपासणीची शिफारस करण्यास हरकत नाही.
- अंतिम अहवाल तयार करुन वन्यजीव (संरक्षण) अधिनियमाच्या कलम ५५ नुसार तक्रार तयार करावी आणि ती न्यायालयांत दाखल करावी.
- वन्यजीवांच्या मृत्युच्या कारणासंबंधी अंतिम अहवाल मुख्य वन्यजीवरक्षकांना सादर करावा. हा अहवाल संबंधित क्षेत्र संचालक/वन्यजीव रक्षक/वनसंरक्षक / मुख्य वनसंरक्षक यांनी राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाला मुख्य वन्यजीव रक्षक मार्फत सादर करावा.

**(iii) वरिष्ठ अधिकारी यांच्याकडून करावयाची कार्यवाही.**

- घटनेची प्रारंभिक सुचना राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण/ मुख्य वन्यजीव रक्षक/क्षेत्रीय उपनिदेशक (आर.डी.डी) WCC Bureau ला त्वरीत पाठवावी. (एस.एम. एस/इ-मेल /दुरध्वनीद्वारे सुचना/फॅक्सद्वारे)
- राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सूचनानुसार (Protocol) शव-विच्छेदन तपासणीसाठी पथक (Team) तयार करणे.
- विशेष तपासणी पथक शव-विच्छेदन पाठवावा. तपास अधिकारी नियुक्त करुन त्याप्रमाणे कार्यालयीन आदेश जारी करावा.
- पूर्वीचे आणि सध्याचे गुप्तवार्ता अहवालाचे विश्लेषण करुन त्यातुन काही सुत्र गवसते काय ते पहावे; अट्टल गुन्हेगारांचे/संशयितांचे मोबाईलचे रेकाड्र्स तपासावे;

त्याचप्रमाणे बाजुच्या जिल्ह्यांत, विभागात, राज्यात त्याविषयी खातरजमा करुन घ्यावी

- आवश्यकतेनुसार नाकाबंदी करुन वाहनांची तपासणी करावी, स्थानीक पोलिसांना कळवावे आणि धोक्याची सूचना जारी करुन बाहेर जाण्याच्या सर्व मार्गांवर वाहनांची तपासणी करावी.
- प्राण्याच्या मृतदेहाच्या छायाचित्राची तपासणी करुन त्यांची राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणातील नॅशनल रिपोझटरीच्या कॅमेरा ट्रॅप (NCRTPT) मधे असलेल्या छायाचित्राबरोबर तूलना करावी, किंवा ही तूलना Phase IV कॅमेरा ट्रॅप मॉनीटोरींग डेटाबेस किंवा इतर संशोधन डेटाबेस बरोबर करुन त्याची आणि ओळख पटवावी.
- मुख्य वन्यजीव रक्षकाच्या मार्फत घटनेचा शासकीय प्रेसनोट प्रसिध्द करावी.
- मुख्य वनसंरक्षकाच्या मार्फत आरोपीचे शारिरिक वर्णनाचा तपशील राष्ट्रीय व्याघ्र संवर्धनप्राधिकरणाकडे पाठवावा, जेणेकरुन इतर क्षेत्र संचालक/राज्ये/ वन्यजीव गुन्हा नियंत्रण ब्युरो (WCCB), इ.ना. सचेत करता येईल. त्याचप्रमाणे इतरत्र घडलेल्या गुन्ह्याचा सदरहु गुन्हांशी संबंध असलेल्या शक्यतेचा पडताळा घेता येईल.
- तपासकामाचे व्यवस्थित पर्यवेक्षण आणि बारकाईने नियमित संनियत्रन (मॉनीटोरींग) करावे. पोलिस विभागाशी संपर्क साधुन असावे. त्याचप्रमाणे राज्याचे व्याघ्र कक्ष (उपलब्ध असल्यास) वन्यजीव गुन्हे नियंत्रण ब्युरो व इतर तपास संस्थांच्या संपर्कात असावे.
- अंतिम अहवाल तयार करुन तो मुख्य वन्यजीव रक्षकांना सादर करावा आणि त्याप्रमाणे राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाला कळवावे. **जोपर्यंत वाघाचा मृत्यू नैसर्गिकरित्या झाला याचे स्पष्टीकरण राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाला पुराव्यासह मिळत नाही, तोपर्यंत सर्व वाघांचा मृत्यु अवैध शिकारीमुळे झाला असे समजण्यात यावे.**
- सर्व अवैध शिकारीची आणि जप्तीची प्रकरणे कार्यकक्षेतील संबंधित न्यायालयात दाखल करावीत.

- न्यायालयात चालू असलेल्या प्रकरणांचे जोपर्यंत त्यांचा निर्णय होत नाही तोपर्यंत बारकाईने नियमित संनियंत्रण (मॉनीटरींग) करित राहवेत.
- न्यायालयीन आदेशानंतर सदर प्रकरणाचे विश्लेषण करून सुधारात्मक कार्यवाही (गरज असल्यास) करणेकरिता वरिष्ठ न्यायालयात अपील करणे.
- जर न्यायालयीन आदेश समाधानकारक असल्यास प्रकरण बंद करावे आणि त्याचा अहवाल मुख्य वन्यजीव रक्षक यांना पाठवावा व राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनाही माहिती कळवावी.

## FORMAT FOR PRELIMINARY REPORTING OF TIGER MORTALITY

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of detection: | |
| 2 | Detected by: | |
| 3 | Area Details (Tiger Reserve/Protected Area/Division & Circle): | |
| 4 | Area-(Range/Round/Beat/Village): | |
| 5 | GPS - coordinates: | |
| 6 | Sex (Male/Female/Unknown): | |
| 7 | Age (Adult/Sub-adult/Cub): | |
| 8 | Probable cause (Accident/Infighting/Poisoning/ Electrocution/old age/others-specify): | |
| 9 | Any other remarks: | |

Name:

Designation:

Date:

# जोडपत्र -१
## अंतिम अहवाल
## वाघ / बिबटचे मृत शरीर /अवयवांची जप्ती / मृगयाचिन्हांची विल्हेवाट करतांना सादर करावयाची माहिती

| | | |
|---|---|---|
| 1. | कार्यालयाचे नाव | |
| 2. | वाघाच्या मृत्यु स्थळाचे वर्णन / अक्षांश रेखांश / वनखंड क्रमांक / वनपरिक्षेत्र / उपवनविभाग / वनविभाग / व्याघ्र प्रकल्प किंवा ठिकाण / वेळ | |
| 3. | मृत्युचा दिनांक / शवाचा अहवाल | |
| 4. | जप्त शवाची किंवा जप्त केलेल्या अवयवांची स्थिती दर्शविणारी सविस्तर माहिती | |
| 5. | प्रथम माहिती देणाऱ्या इसमाचे अथवा कर्मचाऱ्यांचे नाव / गाव / पत्ता व संर्पकाचा तपशील / दुरध्वनी क्रमांक / ईमेल | |
| 6. | शवाबाबत : दिनांक, वेळ आणि शव विच्छेदनाचे ठिकाण | |
| 7. | शव विच्छेदन पथकातील व्यक्तींची (नावे / हुद्दा / पत्ता / संपर्काचा तपशील) | |
| 8. | हरवलेल्या अवयवांचा तपशील | |
| 9. | शव विच्छेदन अहवाल नंतर निष्पन्न झालेले मृत्युचे कारण (शव विच्छेदन अहवालाची प्रत जोडणे) | |
| 10. | शवाचा रंगीत फोटो (जवळुन घेतलेला, जखम असल्यास ती दर्शविणारा), कॅमेरा ट्रॅपच्या फोटो डेटाबेस (संग्रह) शी तुलना केल्याचा तपशिल. | |
| 11. | मृत्युचे कारण :- नैसर्गिक / शिकार | |
| 12. | शिकार / जप्त केलेल्या अवयवांबाबतः- | |
| | i ) करण्यास आलेली / प्रस्तावित कार्यवाही<br>ii) जप्त केलेल्या शरीराच्या भागाचे रंगीत फोटोग्राफ जोडावे<br>iii) (हाडाचे तुकडे / मांस / शरीराचे इतर भाग, ज्यावरुन प्राण्यांची ओळख पटत नसल्यास), प्रजातीची ओळख बाबतचे प्रमाणपत्र जोडावे<br>iv) गुन्हेगार /संशयितावर (जर अटक केली असल्यास) केलेली कारवाई<br>v) केस / तक्राररीची सद्यःस्थितीः क्रमांक, तक्रार दाखल केल्याची दिनांक, कायद्याची कलमे, तक्रार दाखल केलेल्या न्यायालयाचे नाव | |
| 13 | मृत शरीर / शरीराचे अवयव विल्हेवाट लावल्याचा पंचनाम/मेमो | सोबत जोडला आहे/ नाही |
| 14. | शेरा (जर असेल) | |
| 15. | संबंधीत क्षेत्राच्या नियंत्रण अधिकाऱ्याची सही, नाव, पदनाम, दिनांक आणि शिक्का | |

**( ही कार्य पध्दती व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रिय अधिकारी यांच्या सल्ल्याने बनविली )**

# २

# वाघ, बिबट यांचे मृत शरीर / अवयव नष्ट करावयाची प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती. मार्च, २०१३

## फक्त व्याघ्र प्रकल्प नव्हे तर संपूर्ण क्षेत्रासाठी लागू

क्षेत्रिय स्तरावर (व्याघ्र प्रकल्प किंवा इतरत्र) वाघ, बिबटयांचे मृत शरीर आढळून आल्यास किंवा वाघ, बिबटयांचे अवयव जप्त केले असल्यास त्यांची विल्हेवाट करणे करिता पारदर्शीपणे नष्ट करुन त्यांचा अवैध व्यापार होणार नाही, याबाबत हि प्रमाणभूत कार्यपध्दती सुचविते. प्रमाणभूत कार्यपध्दती ही व्याघ्र प्रकल्प क्षेत्राबरोबरच ज्या ठिकाणी घटना घडली आहे अशा सर्व प्रकारच्या क्षेत्राला लागू आहे.

## जबाबदारी :

| | |
|---|---|
| राज्य स्तरावर | (CWLW) राज्य मुख्य वन्यजीव रक्षक |
| व्याघ्र प्रकल्प | (F.D.) क्षेत्र संचालक |
| राष्ट्रीय उदयान / वन्यजिव अभयारण्य संवर्धन राखिव क्षेत्र | क्षेत्र व्यवस्थापक |
| इतर क्षेत्राबाबतीत (जसे महसुल जमीन /संवर्धन राखीव क्षेत्र /लोकसंवर्धन राखीव क्षेत्र / गाव/ शहरी क्षेत्र) यामध्ये वन्यजीव (संरक्षण) अधिनीयम - १९७२ अन्वये | वन्यजीव रक्षक किंवा ज्यांचे अधिकार क्षेत्र आहे असे विभागीय वन अधिकारी / उपवनसंरक्षक जबाबदार राहतील. |

**'वन्यजीव रक्षक' म्हणून वनरक्षक, वनपाल, वनक्षेत्रपाल व सर्व वरिष्ठ अधिकारी प्रत्येक वनरक्षक, वनपाल व वनपरिक्षेत्र अधिकारी हे अधिनस्य क्षेत्रसाठी 'वन्यजीव रक्षक' म्हणून घोषीत करण्यात आलेले आहेत.**

**८. वाघ, बिबट यांचे मृत शरीर / जप्ती केलेले अवयव आढळून आले आहेत, तेथे मृत शरीर/अवयव नष्ट करणेविषयीच्या सविस्तर सुचना**

(I) **गुन्हा घडल्याचे स्थळ / घटना:-** जेथे मृत शरीर किंवा शरीर अवयव आढळुन आले आहेत

- वाघ मृत्यु / शरीर अवयव जप्तीबाबत कारवाई करताना राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने जारी केलेल्या प्रमाणभूत कार्यपध्दतीचा अवलंब करावा.
- सामाजिक संस्था मधील प्रतिनिधीत्व असलेल्या स्वतंत्र शवविच्छेद चमु बरोबर क्षेत्रसंचालक किंवा उपवनसंरक्षक दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्या समोरच मृत शरीराचे दहन करुन ते नष्ट करावे.

- मृत शरीर दहन करुन नष्ट करतानाच्या पूर्ण प्रक्रियेचे संगतवार छायाचित्रण व व्हीडीओ चित्रीकरण करावे.
- दहन स्थळ सोडण्यापुर्वी मृत शरीर त्याच्या हाडांसहीत पुर्णपणे जळाल्याची खात्री करावी.
- मृत शरीर संपुर्ण जळाल्याची खात्री केल्यानंतर शवविच्छेदन चमु व संबंधीत नियंत्रण अधिकारी यांची स्वाक्षरी असलेला, मृत शरीरदहन केल्याबाबतचा पंचनामा तयार करुन अंतिम अहवाल (जोडपत्र – १ प्रमाणे) मुख्य वन्यजीव रक्षक यांना सादर करावा, त्याची प्रत संबंधीत छायाचित्रे व दस्ताऐवजासह राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांना पाठवावी.
- क्षेत्रिय स्तरावर (व्याघ्र प्रकल्प किंवा इतरत्र) वाघ, बिबटयांचे मृत शरीर आढळून आल्यास किंवा वाघ, बिबटयांचे अवयव जप्त केले असल्यास त्यांची विल्हेवाट करणे करिता पारदर्शीपणे नष्ट करुन त्यांचा अवैध व्यापार होणार नाही, याबाबत हि प्रमाणभूत कार्यपध्दती सुचविते.

**वाघाच्या मृत्यु झाल्यास वापरावयाची कार्यपध्दती मधील जोडपत्र 1 व इतर अनुषांगीक कार्यपध्दती अनुसरावी.**

# ३

# मानवी वास्तव्य असणाऱ्या भागात वाघाच्या भरकटण्यामुळे उद्भवलेली आणीबाणीची परिस्थिती हाताळणेबाबतची प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती. जानेवारी, २०१३

## फक्त व्याघ्र प्रकल्प नव्हे तर संपूर्ण क्षेत्रासाठी लागू

सदर कार्यपध्दती माणसाचा मृत्यु वा माणसांस जखमी करणे, तसेच वाघ, पाळीव प्राणी वा संपत्ती याची हानी न होता मानवी वस्तीत भरकटलेल्या वाघास सुव्यवस्थीतपणे हाताळतांना क्षेत्रिय स्तरावर (व्याघ्र प्रकल्प व त्याबाहेर) घ्यावयाच्या किमान मूलभूत खबरदाऱ्यांची ही प्रमाणभूत कार्यपध्दती माहिती देते. ही प्रमाणभूत कार्यपध्दती व्याघ्र प्रकल्पासह संबंधीत वनक्षेत्र तसेच अशा घटना घडणाछया सर्व क्षेत्रामध्ये लागू राहील.

## जबाबदारी :

| | |
|---|---|
| राज्य स्तरावर | (CWLW) राज्य मुख्य वन्यजीव रक्षक |
| व्याघ्र प्रकल्प | (F.D.) क्षेत्र संचालक |
| राष्ट्रीय उदयान / वन्यजिव अभयारण्य संवर्धन राखिव क्षेत्र | क्षेत्र व्यवस्थापक |
| इतर क्षेत्राबाबतीत (जसे महसुल जमीन /संवर्धन राखीव क्षेत्र /लोकसंवर्धन राखीव क्षेत्र / गाव/ शहरी क्षेत्र) यामध्ये वन्यजीव (संरक्षण) अधिनीयम - १९७२ अन्वये | वन्यजीव रक्षक किंवा ज्यांचे अधिकार क्षेत्र आहे असे विभागीय वन अधिकारी / उपवनसंरक्षक जबाबदार राहतील. |

**'वन्यजीव रक्षक' म्हणून वनरक्षक, वनपाल, वनक्षेत्रपाल व सर्व वरिष्ठ अधिकारी प्रत्येक वनरक्षक, वनपाल व वनपरिक्षेत्र अधिकारी हे अधिनस्य क्षेत्रसाठी 'वन्यजीव रक्षक' म्हणून घोषीत करण्यात आलेले आहेत.**

१) सुरुवातीस तांत्रीक मार्गदर्शनासाठी व दररोजच्या संनियंत्रणाकरीता (monitoring) खालीलप्रमाणे एका समितीची स्थापना करावी.

i. मुख्य वन्यजीव रक्षक (CWLW) यांनी नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी
ii. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी
iii. एक पशुवैद्यकीय अधिकारी
iv. स्थानिक अशासकिय संस्थेचा (NGO) प्रतिनिधी
v. स्थानिक स्वराज्य संस्थेचा (ग्राम पंचायत, पंचायत समिती, जि.प.) एक प्रतिनिधी
vi. **संबंधित क्षेत्र संचालक/संरक्षित क्षेत्राचे व्यवस्थापक/विभागीय वनअधिकारी / उपवनसंरक्षक - अध्यक्ष**

२) भारतीय वन्यजीव संस्था देहरादूनचे तज्ञ मदतीला नेहमीच मिळणे शक्य नसल्याने, स्थानिक क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीला संनियंत्रणाकरीता (monitoring) बोलविण्यात यावे.

३) कॅमेरा ट्रॅप फोटोंचे राष्ट्रीय भांडार (National Repository of Camera Trap Photographs of Tigers) किंवा प्रकल्प स्तरावरील फोटोंशी तुलना करुन वाघाची ओळख पटवून घ्यावी व त्याच्या स्त्रोत (मूळ) क्षेत्राची (Source Area) माहिती करुन घ्यावी.

४) मागील काही दिवसात, त्याभागातील वाघाने पाळीव प्राण्यांची शिकार, मानवास जखमी करणे, तसेच प्राणघातक हल्ला केलेल्या घटनांची माहिती प्राप्त करुन घ्यावी. जर या क्षेत्राला अशा घटनांचा पूर्व इतिहास असेल तर वाघासंबंधीत वारंवार उद्भवणाऱ्या आणीबाणीच्या प्रसंगाची कारणमीमांसा करणेसाठी विस्तृत शास्त्रीय अभ्यास करणे, आवश्यक आहे.

५) मानवी वस्तीत वाघाच्या भरकटण्याच्या घटना वारंवार आढळल्यास, सदर प्राण्याला पकडण्यासाठी त्या जागेवर जास्त गोंधळ न करता योग्य आमिषासह (bait/Lure)स्वयंचलित पिंजरा (Atomatic closure trap) लावावा.

६) संबंधीत प्राण्याची ओळख पटविण्याकरीता / खात्री करण्याकरीता पाळीव प्राण्यांच्या शिकारीच्या ठिकाणी कॅमेरा ट्रॅप लावावा.

७) शिकार झालेल्या पशूचे मृतदेह (kill) वाघाने खाण्याकरीता (मानवी वस्तीपासुन फार जवळ नसल्यास) संरक्षण द्यावे व त्यावर स्थानिकांकडून बदला घेण्यासाठी विषप्रयोग होणार नाही, याची खात्री करावी.

८) संबंधीत प्राण्याच्या रोजच्या हालचालींची माहिती करुन घेण्याकरीता क्षेत्रामध्ये 'प्रेशर इंम्प्रेशन पॅड' (PIP) तयार करावे व त्याची माहिती (४ इंच, १ मैल किंवा १:५०,००० प्रमाणावर) नकाशावर दाखवावी.

९) स्थानिक नागरिकांची होणारी गर्दी टाळण्यासोबतच, त्या क्षेत्रामध्ये कायदा व सुव्यवस्था ठेवण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हाधिकारी/ जिल्हा न्यायदंडाधीकारी / वरीष्ठ पोलीस अधिक्षक / पोलीस अधिक्षक यांची विशेषत्वाने सक्रीय मदत घ्यावी.





त्यांना मानव - वन्यजीव संघर्ष व त्याविषयीच्या राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सुचनांबाबत अवगत करावे..

१०) मानवी वस्त्यांमध्ये वाघ/बिबटच्या भरकटण्याच्या प्रत्येक घटनांमध्ये जिल्हा प्रशासने दंड प्रक्रि या संहिता (CrPC) च्या कलम १४४ च्या वापरासह कायदा व सुव्यवस्था टिकेल याची काळजी घ्यावी. अन्यथा प्राणी ज्या जागेवर आहे तेथील लोकांचे आंदोलन/क्षोभामुळे प्राण्याला पकडण्याची अडथळे निर्माण होतात व कर्मचारी तसेच नागरिकांना ईजा होऊ शकते. पोलीस व स्थानिक प्रशासनाला अगदी सुरुवातीपासूनच निर्णय प्रक्रियेत सामावून घेणे गरजेचे आहे. जमावाच्या नियंत्रणासाठी परिणामकारक समन्वय आवश्यक आहे. समन्वयाअभावी अनेक प्रसंगी, यामुळे टाळता येऊ शकणाऱ्या दुर्घटना व प्रसंग ओढवलेले आहेत.

११) वाघाच्या क्षेत्रीय अस्तीत्वासंबंधी गावागावांत पूर्वसूचना देण्याकरीता जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांची मदत घ्या.

१२) जर प्राण्याला पिंजऱ्या पकडण्यास वारंवार प्रयत्न करण्यास अपयश येत असल्यास तर, पशुवैद्‌यकाचा अंतर्भाव असलेल्या तज्ञ पथककडून रासायनिक अचलीकरणाचा (बधिरीकरण) (Tranquilization) वापर करावा.

१३) जर अचलीकरण (बधिरीकरण) केलेला वाघ सुदृढ व तरुण असेल व कुठल्याही दृष्टीने अकार्यक्षम (सुळे दात तुटणे / जखमी /तुटलेला पंजा इत्यादी) नसेल तर परिच्छेद १ मध्ये गठीत समितीने निश्चित केल्यानुसार राष्ट्रीय व्याघ्र





संवर्धन प्राधिकरणाला सूचीत करुन, पुरेसे खाद्य असलेल्या व मानवी वास्तव्यापासून दूर असलेल्या, तसेच इतर नर वाघाचे क्षेत्र नसलेल्या सुयोग्य अधिवासात रेडीओ कॉलरींग करूनच मुक्त करावे. (कुठल्याही परिस्थितीत जखमी किंवा अकार्यक्षम वाघास परत जंगलात मुक्त करु नये आणि त्यास मान्यताप्राप्त प्राणी संग्रहालयात ठेवावे.)

१४) कुठल्याही परिस्थितीत मनुष्य हानीच्या सवय नसलेल्या वाघास वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ चा उपयोग करुन मारण्यात येवू नये.


१५) सुदृढ वाघ किंवा पिल्ले असलेली वाघीण हे उसाचे शेत किंवा त्यासारख्याच अधिवासात असेल, तर त्यास आधी, विना अडथळा जवळच्या जंगलाकडे जाईल असा प्रयत्न करावा. जर अशा कार्यात अपयश आले तर प्राण्यास रासायनिक अचलीकरणाव्दारे (बधिरीकरण) पकडण्यात येवून रेडिओ कॉलरींग करून जवळच्या व्याघ्र प्रकल्प किंवा संरक्षीत क्षेत्रातील वाघाची कमी घनता असलेल्या प्रदेशात सोडावे.

१६) आवश्यक वाटल्यास घटनेची किंवा त्या संबंधीत चुकीची माहिती पसरण्यापासून रोखण्याकरीता वनविभागाचा अधिकृत प्रवक्ता नेमण्यात यावा व त्याने प्रसार माध्यमांना वेळोवेळी माहिती द्यावी, अन्यथा अतिशयोक्तीपूर्ण / अपुऱ्या माहितीमुळे अधिक नुकसान होऊ शकते.

१७) कॅमेरा ट्रॅपव्दारे वाघांची गणना (टप्पा-IV) सुरु असल्यास राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाकडून तपासून घेतल्याशिवाय प्रदेशातील वाघांच्या वैयक्तीक मिळालेल्या फोटोवरून काढलेल्या न्युनतम वाघांच्या संख्येस, अवास्तव प्रसिध्दी देवू नये.

१८) वाघाला वन्यस्थितीत (wild) मुक्त करणे किंवा प्राणीसंग्रहालयात देणेबाबतचा अंतीम निर्णय मुख्य वन्यजीव रक्षक यांनी घ्यावा.

१९) पकडलेल्या मांसाहारी प्राण्यास कमीत कमी ताण (Stress) पडेल अशा प्रकारे योग्यरित्या पिंजऱ्याची रचना आणि वाहतुकीची सुविधा करणे आवश्यक आहे.



# वाघ संनियंत्रणासाठी करावयाच्या बाबी
## (Prioritising Areas for Tiger Monitoring)

काही सुरक्षित क्षेत्रे आणि लगतच्या जंगलाशिवाय वाघांची स्त्रोत क्षेत्र (Source Area) व सभोवतीचे जंगल येथे वाघाची संख्या जास्तीत जास्त असते. ज्या विभागात जिल्हा / वनविभागाच्या जंगलामध्ये वाघाचे अस्तित्व नकाशावर दर्शविले आहे, अशा ठिकाणी दररोज सनियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. यासाठी खालीलप्रमाणे कृती सूचित केलेल्या आहेत.

१) फोटो डाटाबेस तयार करण्यासाठी (Phase-IV) जेथेजेथे वाघांची स्त्रोत क्षेत्र (Source Area) आहे अशा ठिकाणी कॅमेरा ट्रॅप वापरून संनियंत्रण करावे. जेणेकरून त्या भागातील वाघांची ओळख ठरविण्यात येईल.

२) स्त्रोत क्षेत्राजवळच्या विविध भागात आढळून आलेल्या वाघांच्या छायाचित्रांची वेळोवेळी फेरतपासणी आणि तुलना करून त्यामध्ये वाघांची ओळख (ID) ठरवावी.

३) दररोजच्या नोंदी करणेबरोबरच कॅमेरा ट्रॅप संनियंत्रणास पुरक असे आजुबाजुच्या क्षेत्रात पायदळ गस्ती करावी.

४) वाघाने केलेल्या पाळीव जनावरांच्या शिकारीवर लक्ष ठेवून नागरिकांना नियमानुसार नुकसान भरपाई द्यावी.

५) वाघाचा वावर असलेल्या भागात त्या जमिनीचा एकदम काही वेगळा वापर सुरू झाल्यास त्याभागात लक्ष ठेवावे.

६) व्याघ्र प्रकल्पाच्या बाहेर वनविभागाकडे येणाऱ्या पारंपरिक वाघ आणि वन्यजीव कॉरीडोर (विचरण) क्षेत्रात कोणतेही अडथळे येऊ देऊ नयेत.

७) वाघाचा वावर असलेल्या क्षेत्रात झाडीचे (Cover value) आवरण मध्ये अचानक होणाऱ्या बदलावर लक्ष ठेवावे. (उदा. पीक पध्दतीमध्ये होणारे बदल इत्यादी)

८) नदीलगत होणाऱ्या वाघांच्या हालचालींवर नजर ठेवणे.

९) वाघांचा वावर असलेल्या भागांमध्ये किटकनाशकांच्या विक्री व वापर करणाऱ्यांवर लक्ष ठेवावे. (पाण्यातून विषबाधा टाळण्यासाठी)

१०) शिकार करण्याच्या हेतूने त्या भागात वावरणाछया पांरपारीक शिकारी टोळींसंबंधीत गुप्त माहिती गोळा करण्यासाठी स्थानिकांच्या माध्यमातून जाळे तयार करावे.

११) स्थानिक आठवडी बाजारांवर लक्ष ठेवणे.

१२) व्याघ्र प्रकल्पाच्या बाहेरच्या क्षेत्रात ग्रामसभा पातळीवर वन्यजीव संनियंत्रण नोंदवही तयार करावी / नियमित नोंदी ठेवाव्यात आणि वाघाच्या वावर/हालचालीबाबत माहिती देणाऱ्यास बक्षीस दयावे.

१३) ग्रामसभा पातळीवर वन्यजीव/वाघ गुन्हा नोंदवही तयार करावी/नोंदी भराव्यात आणि गुन्हा शोधण्यात मदत करणाछयास बक्षीस देण्याची पध्दत सुरू करावी.

१४) महामार्ग, विहीर (openwell), रेल्वेचे ट्रॅक, विद्युत वाहिन्या, गावतलाव, नैसर्गिक पाणवठे, शेतीस पाणीपुरवठा करणारे कालवे इत्यादींवर लक्ष ठेवण्यासाठी विशेष संनियंत्रण पथक (Special monitoring Team) तैनात करावे.

१५) वाघांचा वावर असलेल्या क्षेत्रातील विहीरी आणि कालवे (irrigation Canal) झाकण्या बरोबरच जास्त भाराच्या विद्युतवहन खांबांना विद्युतरोधक (Insulating) करावे.

१६) वाघाचे अस्तीत्व असलेल्या क्षेत्रातील बच्चे असलेल्या वाघीणीच्या हालचालीवर विशेष लक्ष ठेवून मोठे झालेले वाघांचे बच्चे कोणत्या क्षेत्रात स्थलांतरण करतात, त्यावर लक्ष (monitoring) ठेवावे.

१७) ठराविक दिवसांनी नियमितपणे पाणवठे/वर्षभर चालणारे पाण्याचे स्त्रोतांची तपासणी करून पाण्यात कोणताही विषप्रयोग झालेला नाही हे तपासावे.

१८) वाघाचे अस्तीत्व असलेल्या क्षेत्रात शिकार टाळण्यासाठी योग्य दबावाबरोबर स्थानिक लोकांना वेळोवेळी सावध करावे.

१९) वाघाचे नैसर्गिक भक्ष्य (Prey) असलेल्या प्राण्यांमध्ये रोगांचा प्रसार टाळण्यासाठी वाघाचे अस्तित्व असलेल्या क्षेत्रातील गावांतील पाळीव गुरांमध्ये होणाऱ्या रोगाच्या प्रसारावर नियमित लक्ष ठेवावे.

२०) विषबाधा/शिकार टाळण्यासाठी वाघाचे अस्तीत्व असलेल्या क्षेत्रातील नैसर्गिक चाटण (Salt-licks) असलेल्या ठिकाणावर नियमित लक्ष ठेवावे.

२१) शिकारीचे ‘जीन ट्रॅप व स्नेअर’ (Gin trap & snare) बनविणाऱ्या स्थानिक लोहारावर नियमित लक्ष ठेवावे.

२२) वन्यजीव गुन्हा संबंधित व्यक्तीचा माहिती संग्रह (Dossier) तयार करा आणि वाघाचे अस्तित्व असलेल्या क्षेत्रातील क्षेत्रीय दलाला (Field unit) बरोबर राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणास सूचित केल्यानंतर त्या माहितीची देवाणघेवाण करावी.



# ४

# जंगलातील वाघांच्या सोडून दिलेल्या /अनाथ बछड्यांसाठी आणि वयस्कर किंवा जखमी वाघांसाठी वापरावयाची प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती. जुलै, २०१४

सदर प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धतीमुळे वाघांचे परित्यक्त/अनाथ बछडे किंवा वयस्कर/जखमी वाघ यांचे संबंधात उद्भवलेली परिस्थिती हाताळण्याकरिता कार्यक्षेत्र स्तरावर (वाघाच्या संरक्षित किंवा तत्सम क्षेत्रात) घ्यावयाचे मुलभूत निर्णय, करावयाची कार्यवाही आणि घ्यावयाची सावधगिरी, याबाबत माहिती मिळते. वाघाच्या राखीव क्षेत्रासह सर्व प्रकारच्या वनांसाठी जेथे वाघ आहेत तेथे ही प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धती लागु आहे.

## जबाबदारी :

| | |
|---|---|
| राज्य स्तरावर | (CWLW) राज्य मुख्य वन्यजीव रक्षक |
| व्याघ्र प्रकल्प | (F.D.) क्षेत्र संचालक |
| राष्ट्रीय उदयान /<br>वन्यजिव अभयारण्य<br>संवर्धन राखिव क्षेत्र } | क्षेत्र व्यवस्थापक |
| इतर क्षेत्राबाबतीत<br>(जसे महसुल जमीन /संवर्धन राखीव क्षेत्र<br>/लोकसंवर्धन राखीव क्षेत्र / गाव/ शहरी क्षेत्र)<br>यामध्ये वन्यजीव (संरक्षण)<br>अधिनीयम - १९७२ अन्वये | वन्यजीव रक्षक किंवा ज्यांचे<br>अधिकार क्षेत्र आहे असे विभागीय<br>वन अधिकारी / उपवनसंरक्षक<br>जबाबदार राहतील. |

**'वन्यजीव रक्षक' म्हणून वनरक्षक, वनपाल, वनक्षेत्रपाल व सर्व वरिष्ठ अधिकारी प्रत्येक वनरक्षक, वनपाल व वनपरिक्षेत्र अधिकारी हे अधिनस्थ क्षेत्रसाठी 'वन्यजीव रक्षक' म्हणून घोषीत करण्यात आलेले आहेत.**

**वाघांचे परित्यक्त / अनाथ बछडे किंवा वयस्कर / जखमी वाघ / आईने सोडून दिलेले यांचे संबंधात उद्भवलेल्या परिस्थिती करिता कारणीभूत ठरणाऱ्या गोष्टी / कारणे / परिस्थिती.**

**अ ) वाघांचे परित्यक्त /अनाथ बछडे**

**( Abandoned/Ophaned Tiger Cubs )**

i. आईच्या मृत्युमुळे (अवैध शिकारीमुळे/आपसातील संघर्षामुळे/किंवा इतर नैसर्गिक कारणांमुळे) परित्यक्त / पोरके झालेले बछडे.

ii. जन्मत: असमर्थ / अपंग असणारे बछडे.

iii. वाघाचे अशक्त बछडे / वाढ खुंटलेले बछडे.



iv. जखमी / आजारी बछडे.

ब) वयस्कर / जखमी /आजारी वाघ

i. वृद्ध आणि निसर्गात शिकार करण्यास असमर्थ

ii. जखमी झाल्यामुळे असमर्थ (नैसर्गिक, आपसातील संघर्ष किंवा इतर कारणामुळे)

iii. सुळे (Canines) तुटल्यामुळे असमर्थ

iv. सायाळाच्या काट्याने (Porcupine quill) झालेल्या जखमांमुळे स्वतःचे भरणपोषण करण्यास असमर्थ.

v. रोगामुळे आजारी पडणे.

**१. वाघाच्या परित्यक्त / अनाथ बछडे आणि वयस्कर / जखमी वाघांच्या संदर्भात करावयाची क्षेत्रातील कार्यवाही**

१) प्रथम एक समिती बनवावी ही समिती तांत्रिक मार्गदर्शन करेल आणि रोजच्या कामावर लक्ष ठेवेल. समितीत खालील सदस्य असतील.

i. मुख्य वन्यजीव रक्षकांचा प्रतिनिधी

ii. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाचा प्रतिनिधी



iii. पशुवैद्यकीय अधिकारी

iv. स्थानिक अशासकिय संस्थेचा प्रतिनिधी

v. स्थानिक पंचायतचा प्रतिनिधी

२) भारतीय वन्यजीव संस्थेच्या (WII) तज्ञाला नेहमी समितीला मदत करणे शक्य होणार नाही; म्हणुन एखादा स्थानिक तज्ञाची या कार्यावर लक्ष ठेवण्यासाठी मदत घ्यावी.

३) वाघिण/बछडे/वृद्ध/जखमी/आजारी वाघाची ओळख पटविण्यासाठी कॅमेरा ट्रॅप फोटो ची तुलना (National Tiger Conservation Authority) किंवा संरक्षित क्षेत्र स्तरावर असलेल्या फोटो डाटाबेस बरोबर करुन प्राण्याची ओळख पटवावी.

४) मागील काही कालावधीत संबंधित क्षेत्रामध्ये गुराढोरांवर झालेले हल्ले किंवा माणसे जखमी झाल्याच्या घटना / प्राणघातक संघर्षाच्या घटना, इत्यादिची माहिती गोळा करावी.

५) प्रेशर इम्प्रेशन पॅड्स (PIP) तयार करुन वाघाच्या रोजच्या होणाऱ्या हालचालीची माहिती घ्यावी; आणि माहिती (१:५०,०००) प्रमाणाच्या नकाशावर दर्शवावी.

६) जर वाघ ३० किंवा जास्त दिवसांचा असेल तर अशा परित्यक्त /अनाथ वाघाला किंवा

वृद्ध / जखमी आजारी वाघाला अडकवून ठेवण्यासाठी पिंजरा वापरावा किंवा रासायनिक अचलीकरण पध्दतीचा (Chemical Immobilization) वापर करुन त्याला जखडून ठेवावे.

७) वर १) उल्लेख केलेल्या समितीकडून अशा बछड्यांची तपासणी करावी आणि खाली दिल्याप्रमाणे निर्णय घेवुन शिफारस करावी.

i. वाघाच्या बछड्याला जंगलात सोडण्याआधी त्याचे स्थानिक बंदीस्त आवारात संगोपन करावे / जंगलाची सवय झाल्यावर पाठोपाठ परत नंतर मोकळया जंगलात सोडावे.

ii. वाघाच्या बछड्याला अंतिमत: मोकळया जंगलात सोडावे.

iii. प्राणिसंग्रहालयात ठेवण्याआधी बछड्यावर करावयाचे उपचार.

iv वृद्ध/जखमी वाघांना प्राणिसंग्रहालयात पुनर्स्थापित करावे.

८) वन विभागाच्या अधिकृत प्रवक्त्याने, गरज भासल्यास, वेळोवेळी याची माहिती प्रसारमाध्यमाला द्यावी; ज्यामुळे अशा घटनांची/कार्यवाहीची चुकीची माहिती पसरणार नाही. कारण अशा संवेदनात्मक कारणामुळे पुढे नुकसान होऊ शकते.

९) वाघाच्या बछड्याला जंगलात परत सोडावे कि त्याला प्राणिसंग्रहालयात ठेवावे याचा अंतिम निर्णय मुख्य वन्यजीव रक्षक घेतील.

१०) प्राण्यावर ताण पडू नये म्हणून पिंजऱ्याची रचना सुयोग्य तऱ्हेने करावी, त्याचप्रमाणे त्याच्या वाहतुक समयी पाळावयाच्या वर्तन नियमावलीचे (प्रोटोकॉल) पालन करावे.

११) या पुढील कार्यवाही वरिष्ठ वन अधिकारी SOP वाचून करतील.

(जानेवारी २०१३)

# ५ व्याघ्र प्रकल्पांमध्ये भटक्या आणि मोकाट कुत्र्यांबाबत करावयाचे कार्यवाहीबाबत प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धती.

ही प्रचलित कार्यपद्धती (SOP) भटक्या आणि मोकाट कुत्र्यांशी सामना करण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर आवश्यक उपयोजना सुचवते. **ही प्रचलित कार्यपध्दती फक्त व्याघ्र प्रकल्पांना लागू होते.** कुत्र्यांच्या वर्गीकरणाच्या उद्देशाने, भटके कुत्रे हे Animal Birth Control (Dogs) Rules 2001 मध्ये वर्गीकृत केल्यानुसार रस्त्यावरील कुत्र्यांच्या बरोबरीचे मानले जातील.

## जबाबदारी :

| | |
|---|---|
| राज्य स्तरावर | (CWLW) राज्य मुख्य वन्यजीव रक्षक |
| व्याघ्र प्रकल्प | (F.D.) क्षेत्र संचालक |
| राष्ट्रीय उदयान / वन्यजिव अभयारण्य संवर्धन राखिव क्षेत्र } | क्षेत्र व्यवस्थापक |
| व्याघ्र प्रकल्पाच्या बाबतीत फील्ड डायरेक्टर जबाबदार असेल आणि तेथे असलेले स्थानिक प्राधिकरण (प्राणी जन्म नियंत्रण (कुत्रे) नियम, २००१,) यापुढे स्थानिक प्राधिकरण म्हणून संबोधले जाईल.) | राज्य स्तरावरील संपूर्ण जबाबदारी संबंधित राज्याच्या मुख्य वन्यजीव रक्षक यांचेवर राहील. |

**'वन्यजीव रक्षक' म्हणून वनरक्षक, वनपाल, वनक्षेत्रपाल व सर्व वरिष्ठ अधिकारी प्रत्येक वनरक्षक, वनपाल व वनपरिक्षेत्र अधिकारी हे अधिनस्य क्षेत्रसाठी 'वन्यजीव रक्षक' म्हणून घोषीत करण्यात आलेले आहेत.**

## भटक्या /(Feral) कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी सुचवलेल्या क्षेत्रीय कृती;

a) तांत्रिक मार्गदर्शनासाठी समितीची रचना खालीलप्रमाणे:

i) पशुवैद्‌यकीय आणि पशुसंवर्धन विभागातील एक पशुवैद्‌यकीय अधिकारी

ii) आवश्यक असल्यास गैर-सरकारी एजन्सीकडून एक सहकारी पशुवैद्‌य

iii) स्थानिक स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी

iv) पशु कल्याण संस्थेचा प्रतिनिर्धार संबंधित क्षेत्रात कार्यरत असेल तर

v) District Society for Prevention of Cruelty To Animal (SPCA) चे प्रतिनिधी उपस्थित असल्यास




vi) स्थानिक पंचायतीचा प्रतिनिधी

vii) व्याघ्र प्रकल्पाचे उपसंचालक. DFO/DCF- अध्यक्ष

b) भटक्या कुत्र्यांच्या हालचालीचे क्षेत्र तसेच त्यांचा जंगलात प्रवेश होऊ शकतो असे संवेदनशील क्षेत्राची नोंद करावी.

c) स्थानिक पशुसंवर्धन विभाग, उपरोक्त समिती यांच्या समन्वयाने कुत्र्यांच्या संख्येसाठी दृष्य (Visual) मूल्यांकनाद्वारे या क्षेत्रांचे निरीक्षण करावे.

**d) रोग ओळखणे :-**

i) स्थानिक पशुसंवर्धन विभागाकडे प्राणिजन्य (Zoonotic), लक्षात येण्याजोग्या आणि नविन रोगांच्या विशेष संदर्भात कुत्र्यांच्या रोगांची नोंद करावे.

ii) आपल्या क्षेत्रात असे रोग होऊ शकणाऱ्या वन्यप्राण्यांची नोंद करा.

iii) एकदा या रोगांची ओळख पटल्यानंतर, या रोगांसाठी व्यवस्थापन धोरणे एकत्र करा.

iv) स्थानिक पशुसंवर्धन विभागाच्या समन्वयाने एक रेडी रेकनर तयार करा.

**e) भटक्या कुत्र्यांना पकडणे:**

भटक्या आणि मोकाट कुत्र्यांना पकडणे हे भारत सरकारच्या ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया (http://awbi.in/awbied pdf / reviesd_abc_module.pdf). उक्त दस्तऐवजात खालील पद्धतींची यादी देण्यात आली आहे.

i) हाताने पकडणे

ii) Sack and Loop technique

iii) Butterfly net वापरुन पकडणे

iv) Bolinese Pole net technique

**f) पकडलेल्या कुत्र्यांची वाहतूक :**

i) पकडलेल्या कुत्र्यांचे एकमेकांवर हल्ले होणार नाहीत अशा पद्धतीने वाहतूक करावी.

ii) वाहन / पिंजऱ्याची रचना अशी असणे आवश्यक आहे की रस्त्यावरील कुत्र्यांना बाहेर पडू न देता आतमध्ये ठेवता येईल,. वाहन / पिंजरा वापरण्यापूर्वी आणि नंतर पाण्याने स्वच्छ करणे आणि निर्जंतुक करणे आवश्यक आहे.

iii) भटक्या/ मोकाट कुत्र्यांचा धोका गंभीर / वारंवार असल्यास, उपरोक्त मॉड्यूलमध्ये सुचविल्याप्रमाणे एक विशेष वाहतूक वाहन तयार केले जाऊ शकते.

**g) प्राणी जन्म नियंत्रण** Animal Birth Control (ABC) **कार्यक्रम:**

पकडलेल्या कुत्र्यांना ज्या दिवशी पकडले जाईल त्याच दिवशी त्यांना जंतमुक्त केले जावे आणि त्यानंतर प्रोटोकॉलनुसार आणि भारतीय प्राणी कल्याण मंडळाने वर उल्लेख केलेल्या त्यांच्या मॉड्यूलमध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार प्राणी जन्म नियंत्रण उपाय केले जावे.

h) कॅनाइन डिस्टेंपर आणि रेबीज विरूद्ध लसीकरण निर्जंतुकीकरणानंतर सोडल्याच्या दिवशी केले पाहिजे.

i) व्याघ्र प्रकल्पातून पकडलेल्या मोकाट/भटक्या कुत्र्यांना कोणत्याही परिस्थितीत परत सोडले जाऊ नये आणि त्यांच्यासाठी योग्य पर्यायी जागा निवडण्यात यावी.

**भटक्या व मोकाट कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी महाराष्ट्र ( वन्यजीव ) नियम, २०१४ मध्येही तरतुदी दिलेल्या आहेत.**

# ६ सक्रिय व्यवस्थापनासाठी स्त्रोत क्षेत्रांमधून वाघांच्या पूनर्वसनसाठी प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धती.

भारतात वाघांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे, अशी अनेक क्षेत्रे असतील जिथे विखुरणारे वाघ मानवी वस्ती असलेल्या परिसरातून फिरतील आणि काही वेळा मानव वाघ संघर्षास कारणीभूत ठरतील. अशा क्षेत्रांचे संरक्षण आता या संघर्ष परिस्थितीच्या जलद, वेळेवर आणि योग्य शमन करण्यावर अवलंबून असेल. अनेकदा संघर्षात गुंतलेले वाघ किंवा मानवी वर्चस्व असलेल्या परिसरामध्ये येणारे वाघ पकडले जाण्याची शक्यता असू शकते. जर असे वाघ मानवी जीवनासाठी धोकादायक नसतील तर त्यांना पुन्हा जंगलात सोडण्याची शक्यता आहे. तथापि, वाघांना पकडणे आणि त्यांना त्यांच्या उत्पत्तीच्या उगमस्थानी सोडणे ही समस्या सुटणार नाही. जेथे वाघांची घनता खूप जास्त आहे तेथून वाघ बाहेर पडण्याची शक्यता जास्त असते अशा वाघांना कमी व्याघ्र घनतेच्या (किंवा वाघ नसले तरी पूर्वीच्या काळात त्या परिक्षेत्रात वाघांची उपस्थिती नोंदलेली आहे) अशा प्रदेशात स्थलांतरित करणे महत्त्वाचे आहे, ज्यात चांगला अधिवास आणि भक्ष्य प्राण्यांची संख्या जास्त आहे. तथापि, नजीकच्या काळातील समान जनुकीय गुणधर्म असणाऱ्या भागात वाघांना सोडले जातील याची खात्री करण्यासाठी काळजी घेणे आवश्यक आहे.

ही प्रचलित कार्यपद्धती परिक्षेत्र  सर्व स्त्रोत क्षेत्रांमधून वाघांच्या पुनर्वसनासाठी सक्रिय व्यवस्थापनासाठी मूलभूत निकष प्रदान करते. ही प्रचलित कार्यपद्धती सर्व व्याघ्र भूदृश्ये / व्याघ्र प्रकल्प आणि व्याघ्र धारण करणाऱ्या जंगलांना लागू होते.

या संदर्भात बरीचशी कार्यवाही वरीष्ठ स्तरावरच होत असून क्षेत्रीय स्तरावर करावयाच्या बाबी परिस्थितीनुसार सांगितल्या जातात.

## लक्षात ठेवायच्या बाबी:-

१. विखुरलेल्या वाघाची ओळख आणि स्थानांतर / औषधांचा डोस / वाहतूक करण्याची प्रक्रिया NTCA / प्रोजेक्ट टायगर कडून यापूर्वी जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वे / SOP नुसार असेल.

२. ट्रान्सलोकेशन करण्यापूर्वी नवीन साइटवर क्षेत्र संरक्षण / शिकार तळाची पर्याप्तता तपासली पाहिजे.

३. सावधगिरीचा उपाय म्हणून वाघाच्या सौम्य सुटकेला प्राधान्य दिले पाहिजे, ज्यामुळे सोडण्याच्या ठिकाणी नैसर्गिक शिकार असलेले इन सीटू एनक्लोजर तयार करणे आवश्यक आहे.

४. ट्रान्सलोकेशन केलेल्या वाघाला जंगलात सोडल्यानंतर जवळून निरीक्षण करण्यासाठी नेहमी रेडिओ कॉलर लावले पाहिजे.





# ७

# वाघामुळे पशुधन - हानीस सामोरे जाण्यासाठी प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धती.

हीे मानक कार्यप्रणाली (SOP) वाघांद्वारे शिकार केल्या गेलेल्या पशुधनाच्या शवांवर कारवाई करण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर (व्याघ्र अभयारण्य किंवा इतरत्र ) आवश्यक प्राथमिक उपाय आणि खबरदारी याविषयी माहिती देते.

ही प्रचलित कार्यपद्धती जेथे वाघांचा अधिवास आहे अश्या सर्व व्याघ्र प्रकल्पांना आणि क्षेत्राला लागू होते.

## जबाबदारी :

| | |
|---|---|
| राज्य स्तरावर | (CWLW) राज्य मुख्य वन्यजीव रक्षक |
| व्याघ्र प्रकल्प | (F.D.) क्षेत्र संचालक |
| राष्ट्रीय उदयान / वन्यजिव अभयारण्य संवर्धन राखिव क्षेत्र } | क्षेत्र व्यवस्थापक |

व्याघ्र प्रकल्पाच्या बाबतीत क्षेत्र संचालक जबाबदार असतील. संरक्षित क्षेत्रांसाठी (राष्ट्रीय उद्‌यान / वन्यजीव अभयारण्य), संबंधित संरक्षित क्षेत्र व्यवस्थापक जबाबदार असतील. इतर क्षेत्रांच्या बाबतीत (महसूल जमीन / संरक्षण राखीव / सामुदायिक राखीव / गाव / टाउनशिप) वन्यजीव वॉर्डन, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ नुसार, किंवा विभागीय वन अधिकारी/ उप वनसंरक्षक (ज्यांच्या अधिकारक्षेत्रात हे क्षेत्र आहे), जबाबदार असेल. राज्य स्तरावरील संपूर्ण जबाबदारी संबंधित राज्याच्या मुख्य वन्यजीव वॉर्डनवर राहील.

**'वन्यजीव रक्षक' म्हणून वनरक्षक, वनपाल, वनक्षेत्रपाल व सर्व वरिष्ठ अधिकारी प्रत्येक वनरक्षक, वनपाल व वनपरिक्षेत्र अधिकारी हे अधिनस्य क्षेत्रसाठी 'वन्यजीव रक्षक' म्हणून घोषीत करण्यात आलेले आहेत.**

## १. वाघांकडून पशूधनहानी होण्याची कारणे / परिस्थिती

A) गुरांना जंगलात चरण्यासाठी मोकळे सोडणे.

B) वनजमिनीवर अतिक्रमण असल्यास त्याक्षेत्रातील शिकारी वन्यप्राण्यांना पशूधन सहज दिसून पडते.

C) जेव्हा वाघांच्या स्त्रोत क्षेत्राची (व्याघ्र प्रकल्प, अभयारण्ये इ.) वहन क्षमता (Carrying capacity) गाठली जाते तेंव्हा वाघ त्या क्षेत्रातून बाहेर पडण्यास सुरुवात होते. त्यावेळेसही पशूधनहानीचा घटना वाढतात.

D) वनक्षेत्रात जेव्हा बलवान वाघ येतात तेंव्हा त्या क्षेत्रातील वयस्क, कमजोर किंवा अगदीच तरुण असणारे वाघ तेथून बाहेर पडून मानवी वस्तीच्या भागात जातात.


E ) ज्या वनक्षेत्रात अमर्याद चराईमूळे तृणभक्षी वन्यप्राणी राहू शकत नाहीत तेथे पशूधन हानीच्या घटना वाढतात.

F ) जे वनक्षेत्र वाघांकडून Wildlife corridor (वन्यजीव विचरण क्षेत्र) सारखे वापरले जात असते अश्या क्षेत्रात भटकंती दरम्यान वाघांकडून पशूनधनहानी होते.

## २. वाघांमुळे पशुधनाच्या ऱ्हासाला तोंड देण्यासाठी सुचविलेल्या क्षेत्रीय उपाययोजना :-

a) सर्व पशुधनाच्या मृत्यूची नोंद संबंधित नियतक्षेत्रात नियमितपणे केली जावी व त्याविषयी नियमितपणे जनजागृती मोहीम राबविणे आवश्यक आहे. अशा घटनांचा शोध घेण्यासाठी संबंधित क्षेत्रात गुप्त माहिती देणारे नेटवर्क देखील विकसित केले पाहिजे. वाघांनी व्यापलेल्या भागाला लागून असलेल्या वन क्षेत्रात देखील पशुधनाच्या मृत्यूच्या मुद्याबद्दल संवेदनशील बनवणे आणि याची त्वरित तक्रार करणे आवश्यक आहे. गुरेढोरे मारल्यानंतर माहिती देणारे, पशुपालक / गुराखी यांना प्रोत्साहन देणारी यंत्रणाही विकसित केली जाऊ शकते.






b) शिकार आणि त्याच्या सभोवतालच्या जागेवर देखरेख करण्यासाठी खालील सदस्यांसह एक समिती स्थापन केली जाऊ शकते;

- स्थानिक पंचायतीचा प्रतिनिधी
- क्षेत्रसंचालक / उपवनसंरक्षक FD / DCF द्वारे नामनिर्देशित स्थानिक NGO प्रतिनिधी
- एक पशुवैद्यकिय अधिकारी
- उपसंचालक / संरक्षित क्षेत्र व्यवस्थापक / DFO अध्यक्ष अशासकीय सदस्यांना पुरेशा सहकार्यासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे, ज्यासाठी जिल्हा प्रशासन आणि/किंवा जवळच्या व्याघ्र प्रकल्पाच्या समन्वयाने एक यंत्रणा तयार करणे आवश्यक आहे.

c) वाघ/बिबट्यांद्वारे पशुधन हानी झाल्यास, जनावराचे मृत शरीर जागेवरून काढू नये व ते त्यांना पूर्ण खाऊ द्यावे जेणेकरून ते पुन्हा त्या परिसरात पुन्हा शिकार करण्यास येणार नाहीत.

d) शासकिय नियमानुसार बाधित लोकांना त्वरित नुकसान भरपाईची रक्कम दिली जावी.

e) स्थानिकांकडून पशूधनहानी विरुध्द सूडबुध्दीने विषप्रयोग केला जाण्याची शक्यता असते. सबब सूचना मिळताच सदर जनावराच्या प्रेताची निगरानी सुरु करावी. जर सदर घटना मनुष्य वस्तीत झाली असेल तर मात्र सदर प्रेत नष्ट करावे. मात्र वनक्षेत्रानजिक घटना घडली असल्यास सदर प्रेत वाघास पूर्णपणे खाऊ द्यावे. निगराणीसाठी विशेष पथक नेमण्यास यावे.

f) घटना घडल्यानंतरच्या २४ तासातील निगराणी अतिशय महत्वपूर्ण असते. यावेळेत वाघ / बिबट सदर शिकार खाण्यासाठी येऊ शकतात. मात्र २४ तासात शिकारीवर वाघ / बिबट न आल्यास, सदर प्रेत जाळून नष्ट करावे. सदर प्रेत तसेच राहील्यास त्यातून आजार पसरणे, विषबाधा होनेसारखे प्रकार घडू शकतात.

g) निगराणीसाठी Camera Trap लावावा यामुळे शिकार केलेला वाघ/बिबट यांची ओळख पटवता येऊ शकते.

h) नॅशनल रिपॉझिटरी ऑफ कॅमेरा ट्रॅप फोटोग्राफ्स ऑफ टायगर्स (NRCTPT) सोबत कॅमेरा ट्रॅप छायाचित्रांची तुलना करून वाघाची ओळख पटवून घ्या. व्याघ्र प्रकल्प स्तरावरील फोटो डेटाबेस आणि प्राण्याचे स्त्रोत क्षेत्र शोधा.

i) संबंधित क्षेत्रामध्ये अलीकडील गुरे / पशुधनाचा ऱ्हास किंवा मानवी इजा / घातक घटनांचा डेटा गोळा करा. जर परिसरात वारंवार वाघांच्या अशा घटना होत असतील तर त्याचे कारण तपासण्यासाठी तपशीलवार संशोधन कार्य केले पाहिजे.

j) अशा क्षेत्रात वाघाचा मागोवा घेण्यासाठी PIP तयार करावेत. त्यांचे ठिकाणांची नकाशावर नोंद करावी.

k) मानवी वस्तीच्या जवळ असल्यास, स्थानिक जमावाकडून गर्दी टाळण्याबरोबरच, परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी त्या क्षेत्राचे जिल्हाधिकारी यांना सक्रियपणे सहभागी करून घ्या. त्यांना मानव वाघ संघर्ष समस्या आणि परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी NTCA च्या मार्गदर्शक तत्त्वांसह माहिती द्या. आवश्यकतेनुसार जिल्हा अधिकाऱ्यांनी Cr.PC चे कलम १४४ लागू करून कायदा आणि सुव्यवस्था सुनिश्चित करावी.

आंदोलन, गोंधळ झाल्यामुळे वाघास पुन्हा जंगलात पाठवताना / पकडताना अडचणी येतात. ज्यामुळे लोक कर्मचारी गंभीर जखमी होतात.

I) वाघाची स्थानिक उपस्थिती असलेल्या परिसरातील गावांना सतर्क करण्यासाठी जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांची मदत घ्या. वाघांच्या अस्तित्वाबाबत दवंडी किंवा इतर प्रचलित स्थानिक व्यवस्थेद्वारे प्रसारित केले जाऊ शकते जेणेकरुन अशा ठिकाणी स्थानिक येणार नाहीत.

m) वाघ/ बिबट्या हा वृद्धापकाळामुळे/ आजारपणामुळे वारंवार पशूधनहानी करत असल्यास त्यासाठी पुढील SOP वापरव्यात.

a) वाघांच्या अनाथ बछड्यांसाठी व जंगलातील वयस्कर किंवा जखमी वाघांसाठी वापारावयाची प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती


b) मानवी वास्तव्य असणाऱ्या क्षेत्रात वाघाच्या भरकटण्यामुळे उद्‌भवलेली आणीबणीची परिस्थिती हाताळणेबाबतची प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती

# ८

# व्याघ्र संवर्धन मजबूत करण्यासाठी आंतरराज्यीय समन्वयासाठी प्रमाणित प्रचलित कार्यपद्धती.

हो प्रचलित कार्यपद्धती  व्याघ्र संवर्धनाशी संबंधित आंतरराज्यीय समन्वय समस्या हाताळण्यासाठी फ्रेमवर्क प्रदान करते.

ही प्रचलित कार्यपद्धती देशातील आंतरराज्यीय सीमावर्ती व्याघ्र प्रकल्प / पीए / वन क्षेत्रांना लागू आहे ज्यामध्ये वाघांची लक्षणीय संख्या आहे.




सदर कार्यपध्दती पुढील मुद्दयाबाबत भाष्य करते.

१)　वनसंरक्षणाबाबतची कार्यवाही

२)　आपापसात गुप्त माहितीचे आदानप्रदान

३)　वनक्षेत्रातील तण (Invasive Alien Species) व्यवस्थापन

४)　सनियंत्रण व क्षमता वृध्दी करणेबाबत

५)　मानव वन्यजीव संघर्ष व्यवस्थापन बाबत

६)　वन्यप्राण्यांच्या रोगराईबाबत

सदर कार्यवाही ही वरिष्ठ अधिकारीस्तरावर होत असून क्षेत्रिय स्तरावर वरील विषयाबाबत असलेली माहीती व कार्यवाहीसंबधी वरीष्ठांना माहीती देने अपेक्षित आहे.

# १ टायगर सफारीची स्थापना करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे

बफर (अधिसूचित राष्ट्रीय उद्याने आणि / किंवा वन्यजीव अभयारण्यात येत नाही) आणि व्याघ्र प्रकल्पांच्या किनारी भागात टायगर सफारीची स्थापना, व्यवस्थापन आणि प्रशासनाशी व्यवहार करणे.

ही मार्गदर्शक तत्त्वे व्याघ्र प्रकल्पाच्या बफर आणि किनारी भागात टायगर सफारीच्या स्थापनेसाठी, व्यवस्थापनासाठी आणि प्रशासनासाठी आवश्यक असलेले मूलभूत निकष आणि कार्यपद्धती सुचवितात. सदर मार्गदर्शक तत्त्वे व अनुषांगिक कार्यवाही ही वरिष्ठ स्तरावरुन करण्यात येते.

(जानेवारी २०१३)

# १०

# मांजर कुळातील मोठ्या प्राण्यांना मनुष्य भक्षक म्हणून घोषित करणे बाबत मार्गदर्शक सूचना, २००७

# मांजर कुळातील मोठ्या प्राण्यांना मनुष्य भक्षक म्हणून घोषित करणे बाबत मार्गदर्शक सूचना, २००७

**a) प्रतिबंधात्मक उपाय**

i) मानव-वन्य प्राणी संघर्ष कमी करण्यासाठी वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या कलम ३८v अंतर्गत आवश्यकतेनुसार, गाभा क्षेत्राच्या परिघीय क्षेत्रांना त्याच्या व्यवस्थापनासाठी बफर झोन म्हणून घोषित करणे.

ii) सदर क्षेत्रासाठी संपूर्ण व्यवस्थापनासाठी 'व्याघ्र संवर्धन योजना' बनवण्यात यावी.

iii) गावपातळीवर ग्रामपरीसर विकास समित्या मार्फत शाश्वत विकासासाठी प्रयत्न करणे.

iv) संबधित क्षेत्रातील पशूधनहानीबाबत नियमितपणे आढावा घेणे व नुकसान भरपाई देणे.

v) मानवी वस्तीजवळच्या वनक्षेत्रात, पाणवठ्याजवळ PIP तयार करुन वन्यप्राण्यांच्या हालचालींचे निरीक्षण करावे व त्याबाबत गावकऱ्यांना सूचीत कळावे.

vi) गावातील कचरा, मृत पशू यांची योग्य विल्हेवाट लावावी जेणेकरुन वाघ/बिबट यांना त्याच क्षेत्रात शिकारीची सवय होणार नाही.

**(b) नियंत्रण उपाय**

i) क्षेत्रीय कर्मचारी व स्थानिक अनुभवी लोकांच्या मदती GPS/MSTrIPS सह गस्त करुन वाघ/बिबट यांच्या नोंदी ठेवाव्यात.

ii) वाघ/बिबट गावाशेजारी फिरत असल्यास विशेष पथक नेमून गस्ती करावी. अश्या प्राण्यांना पळवण्यासाठी फटाके, आवाज यांचा नियंत्रित स्वरुपात वापर करावा.

iii) आवश्यकतेनुसार गस्तीसाठी हत्ती पथक बोलवावे.

iv) वाघ/बिबट असलेल्या क्षेत्रात स्थानिकांनी जाऊ नये यासाठी गावकऱ्यांची मदत घ्यावी.

v) अशा क्षेत्रात कॅमेरा ट्रॅप, PIP यांचा वापर करुन वाघ/बिबट यांची माहिती घ्यावी.

vi) स्थानिक लोक, कर्मचारी, NGO तज्ञ यांच्या मदतीने वाघाची ओळख पटवून व्यवस्थापनासाठी आवश्यक पूरावे जमा करावेत.

vii) आवश्यक त्या परवानगी मिळाल्यानंतरच वाघास पिंजऱ्यात पकडणे, बेशुध्द करणे इ. उपाय वापरावेत.

## मोठ्या मांजर कुळातील प्राण्यांना मनुष्यभक्षक म्हणून घोषित करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे

वाघ आणि बिबट या दोघांचाही वन्यजीव (संरक्षण) कायदा, १९७२ च्या अनुसूचित) मध्ये समावेश करण्यात आला आहे आणि त्यांना कलम ९(१) अंतर्गत

शिकारीपासून पूर्ण संरक्षण देण्यात आले आहे. जर ते मानवी जीवनासाठी धोकादायक बनले किंवा ते इतके अक्षम किंवा रोगग्रस्त असतील त्यांना पून्हा कधीच व्यवस्थित केले जाऊ शकत नाही तरच त्यांची शिकार केली जाऊ शकते. कलम ११ (१) (अ) अन्वये, केवळ मुख्य वन्यजीव रक्षक यांना अशा प्राण्याची शिकार करण्याची परवानगी देण्याचा अधिकार देण्यात आला आहे आणि तसे करण्यापूर्वी, त्यांनी त्याची कारणे लिखित स्वरूपात सांगणे आवश्यक आहे. मुख्य वन्यजीव रक्षक परिस्थिती आणि कोणत्या टप्प्यावर एखाद्या प्राण्याला मानवभक्षक म्हणून घोषित केले जाऊ शकते याचा निर्णय घेतात, त्याबाबत खालील मार्गदर्शक तत्त्वे दर्शविली आहेत:

मानुष्य मृत्यु आणि मनुष्य खाणे यात फरक करणे आवश्यक आहे. अशा अनेक घटना आहेत ज्यात वाघ आणि बिबटद्वारे मानवांवर अपघाती हल्ला केला जातो आणि परिणामी मृत्यू होऊ शकतो, परंतु ही प्रकरणे केवळ अपघाती हत्या मानली जावीत. अशा परिस्थितींचा समावेश होतो.

i) वाघिणी तिच्या पिल्लांना संरक्षण देत असताना एखाद्या भागात माणसाने जाणे.
ii) झोपलेल्या वाघ / वाघीनीकडे विशेषत: गवत कापणारे, लाकूड गोळा करणारे इत्यादीद्वारे चुकून जवळ येणे. (iii) वाघ जेव्हा त्याला प्राणी मानतो आणि हल्ला करतो तेव्हा माणसाची वाकलेली मुद्रा. अशा प्रकरणांमध्ये, वाघ / वाघी मृत व्यक्तीला पहिल्या प्रकरणात खात नाहीत, परंतु वाघ / वाघिणीला असे अपघात एकापेक्षा जास्त वेळा आढळल्यास ते मृतदेह खाण्यास सुरुवात करू शकते. जर वाघिणी शावकांसह असेल आणि नैसर्गिक शिकार कमी असलेल्या मर्यादित क्षेत्रात मर्यादित असेल तर तिला मृत शरीर खाण्याची अधिक शक्यता असते. नुसत्या मृत शरीराची चरबी खाल्ल्याने हा प्राणी मनुष्यभक्षक असल्याचे सिद्ध होत नाही. त्याचप्रमाणे, एखाद्या विशिष्ट प्राण्याने एकापेक्षा जास्त मानवांना मारले आहे या वस्तुस्थितीवरून देखील तो मनुष्य भक्षक असल्याचे सिद्ध होत नाही. कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी प्राण्याने कोणत्या परिस्थितीत माणसाला मारले याचे तपशीलवार परीक्षण करावे लागेल.

एखाद्या प्राण्याला मनुष्यभक्षक म्हणून प्रस्थापित करण्यासाठी पुरेसा पुरावा जरी समोर आला नसला तरी एका माणसाच्या हत्येनंतर त्या प्राण्याला धोकादायक प्रवृत्ती असल्याची शंका घेण्यास निश्चित जागा आहे, त्याला पकडण्यासाठी पावले उचलली पाहिजेत. मात्र कुठल्याही परीस्थितीत मुख्य वन्यजीव रक्षक यांच्या लेखी परवानगीशिवाय अश्या प्राण्यांना पकडण्यात येऊ नये.

# ११ विद्युत करंटमुळे वाघ आणि इतर वन्यजीवांचे मृत्यू रोखण्यासाठी उपाययोजना.

(NTCA Advisory Dated-20.12.2017)

## विद्युत करंटमुळे वाघ आणि इतर वन्यजीवांचे मृत्यू रोखण्यासाठी उपाययोजना.
(NTCA Advisory Dated-20.12.2017)

### शिफारस केलेल्या कृती:

**क्षेत्रीय स्तरावर:**

- Transmission lines आणि Electric stations/substations चे मॅपिंग करणे आणि त्यावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची ओळख पटवणे.
- वाघांची गावे आणि संरक्षित क्षेत्राबाहेरची हालचाल तपासणे.
- वन विभाग, वीज विभाग अधिकारी आणि PRI/NGO सदस्यांचे संयुक्त पथक तयार करणे.
- Buffer आणि corridor क्षेत्रातील transmission lines वर गस्त घालण्यासाठी योग्य सुरक्षा उपकरणांचा वापर करणे.
- घरगुती आणि शेतीसाठी वीज पुरवठा वेगळा करण्यासाठी यंत्रणा तयार करणे, जेणेकरून संवेदनशील काळात (संध्याकाळ ते सकाळ) शेतीसाठीचा वीज पुरवठा बंद ठेवता येईल.
- Electrocution चे अचूक स्थान (pinpoint location) शोधण्यासाठी संवेदनशील सर्किट ब्रेकर्स (sensitive circuit breakers) बसवणे.
- शेती क्षेत्रांमध्ये सौर ऊर्जा (solar powered) fencing ला प्रोत्साहन देणे.
- कृषी पंप/उपकरणे पुरवठादारांकडून पंप/उपकरण केवळ कायदेशीर कामांसाठीच वापरले जाईल असे हमीपत्र घेणे, अन्यथा जप्ती आणि/किंवा कनेक्शन समाप्त केले जाईल.
- दगडी fencing (stonewall fencing) ची शक्यता पडताळणे, जेणेकरून ungulate जनावरांची हालचाल नियंत्रित होईल, परंतु वन्य मांसाहारी प्राण्यांसाठी प्रवेश असेल.
- वीज विभागाच्या प्रचलित कायद्यांव्यतिरिक्त, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, 1972 (Wildlife (Protection) Act, 1972) अंतर्गत तात्पुरते / कायमस्वरूपी वीज कनेक्शन तोडणे आणि इतर कठोर कारवाई करणे.



**प्रशासकीय स्तरावर:**

- वन विभाग आणि वीज विभाग यांच्यात नियमित बैठका घेणे. बैठकांची वारंवारिता हंगामांच्या संवेदनशीलतेनुसार ठरवली जाऊ शकते, ज्यामध्ये tripping आणि संबंधित विभागांनी केलेल्या कारवाईची माहिती share करणे.
- संबंधित विभागांच्या zonal wise nodal अधिकाऱ्यांची नियमित संपर्कासाठी नेमणूक करणे.
- विस्तार माध्यम, स्थानिक प्रेस क्लब, रेडिओ आणि दूरदर्शन केंद्रांद्वारे जनजागृती कार्यक्रम आयोजित करणे.
- पीक आणि पशुधन विमा योजनांना प्रोत्साहन देण्यासाठी पाऊल उचलणे.
- वीज विभागाशी चर्चा करून संवेदनशील क्षेत्रांमध्ये ट्रान्समिशन लाईन्स इन्सुलेट करण्याची शक्यता तपासणे, तसेच केबल्स जमिनीखालून टाकणे.

# १२ ॲव्हियन इन्फ्लूएंझा प्रतिबंध, नियंत्रण कृती योजना

# ॲव्हियन इन्फ्लूएंझा प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी कृती योजना

**परिचय**

जागतिक प्राणी आरोग्य संघटनेनुसार(OIE), ॲव्हियन इन्फ्लूएंझा (AI) म्हणजे H5 किंवा H7 उपप्रकारांच्या इन्फ्लूएंझा विषाणूमुळे पोल्ट्रीमध्ये होणारे संक्रमण. या विषाणूंचे उच्च रोगजनक क्षमता असलेले एव्हीयन इन्फ्लूएंझा विषाणू (HPAI) आणि कमी रोगजनक क्षमता असलेले एव्हीयन इन्फ्लूएंझा विषाणू (LPAI) असे वर्गीकरण केले जाते. ॲव्हियन इन्फ्लूएंझा (AI) विषाणू शतकानुशतके जगभर पसरलेले आहेत आणि गेल्या शतकात किमान तीन मोठ्या महामारींची नोंद झाली आहे. भारताने 18 फेब्रुवारी 2006 रोजी H5N1 HPAI विषाणूच्या पहिल्या उद्रेकाची नोंद केली. त्यानंतर देशाच्या विविध भागातून HPAI च्या अनेक उद्रेकांची नोंद झाली आहे. सद्यस्थितीतील कृती योजना वन्य पक्ष्यांमधील उद्रेकांमुळे, प्राणी उद्यानांमधील (zoological parks) उद्रेकांमुळे आणि देशातील विविध भागांतील पोल्ट्रीतील उद्रेकांमुळे तयार करण्यात आली आहे.

रोगाचा पुढील प्रसार रोखण्यासाठी खालील उपाययोजना लागू करण्याची विनंती करण्यात येत आहे:

**बाधित प्रजातींचे अलगीकरण :** बाधित किंवा लक्षणे दिसणाऱ्या वाघ आणि इतर मार्जार प्रजातींना (feline species) किंवा इतर कोणत्याही प्रजातींना इतर प्राणी किंवा मानवांमध्ये प्रसार रोखण्यासाठी नियुक्त केलेल्या अलग ठेवण्याच्या क्षेत्रात (quarantine area) स्थानांतरित करा.

**आस्थापना बंद करणे :** जनतेसाठी आस्थापना तात्पुरती बंद करा आणि वर्धित जैवसुरक्षा प्रोटोकॉल सुरू करा.

**प्रवेश निर्बंध :** कर्मचारी, पशुवैद्यकीय आणि कामगारांच्या हालचालींवर निर्बंध घाला. कोणत्याही परिस्थितीत त्यांनी बाधित पिंजऱ्यातून निरोगी पिंजऱ्यात जाऊ नये.

**जैवसुरक्षा आणि निर्जंतुकीकरण मजबूत करणे :** स्थानिक प्राधिकरणांना (पशुसंवर्धन विभाग आणि वन आणि वन्यजीव) जैवसुरक्षा वाढवण्यासाठी आणि ज्या भागात मृत्यूची नोंद झाली आहे त्या संपूर्ण परिसरात व्यवस्थित निर्जंतुकीकरण करण्यासाठी सतर्क करणे आवश्यक आहे.



**नमुना संग्रह आणि चाचणी :** बाधित वाघ आणि इतर मार्जार प्रजातींमधील (feline species) नाकातील स्त्रावांचे नमुने ICAR-NIHSAD, भोपाळ येथे ॲव्हियन इन्फ्लूएंझा विषाणूच्या पुष्टीकरणासाठी आणि स्ट्रेन (strain) ओळखीसाठी पाठवा. याव्यतिरिक्त, संसर्गाच्या संभाव्य स्त्रोतांची ओळख पटवण्यासाठी खाद्य स्त्रोतासह पर्यावरणीय नमुने घेणे.

**असामान्य मृत्यूची नोंद :** पोल्ट्री आणि/किंवा इतर कोणत्याही प्रजातीमध्ये असामान्य मृत्यू झाल्यास त्वरित या विभागाला कळवा.

**पाळत ठेवणे तीव्र करणे :** प्राणीसंग्रहालयातील सर्व प्राण्यांवर सक्रियपणे पाळत ठेवा, विशेषतः बाधित वाघांच्या जवळ असलेल्या प्राण्यांवर लक्ष केंद्रित करा. प्राणीसंग्रहालय परिसरातील वन्य पक्षी आणि इतर संभाव्य रोगवाहकांवर रोगाच्या लक्षणांसाठी लक्ष ठेवा. बाधित क्षेत्रातील पोल्ट्री, विशेषत: बदकांवर पाळत ठेवणे आवश्यक आहे, तसेच सक्रिय पाळत ठेवण्याची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे, ओल्या पक्षी बाजारपेठा, हॅचरी आणि इतर एव्हीयन आस्थापनांमधून नमुने गोळा करणे आवश्यक आहे.

(PPE) हातमोजे, मास्क (mask) आणि संरक्षणात्मक सूट (protective suit) परिधान करणे, प्राणीसंग्रहालय कर्मचाऱ्यांसाठी नियमित आरोग्य तपासणी करणे आणि फ्लू सारखी लक्षणे दिसल्यास लक्ष ठेवणे. प्राणीसंग्रहालय कर्मचाऱ्यांना संभाव्य झोनोटिक (zoonotic) धोके आणि योग्य स्वच्छतेच्या पद्धतींबद्दल शिक्षित करणे.

# नोट्स / Notes

# नोट्स / Notes

# नोट्स / Notes

# ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान




**वन संरक्षक तथा क्षेत्र संचालक यांचे कार्यालय**

**ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प**

मुल रोड, चंद्रपूर - 442401 (महाराष्ट्र)

फोन नं : 07172-251414

ईमेल : (O) ccffdtadoba2@mahaforest.gov.in